ISSN 2278-8808 SJIF 2014 = 4.889
An International Peer Reviewed & Referred
SCHOLARLY RESEARCH JOURNAL
FOR INTERDISCIPLINARY STUDIES

# भविष्यकालीन शिक्षक— शिक्षणातील समस्या, आव्हाने व उपाय

**प्रा.मेहेत्रे स्वाती , डॉ. भांबरे अरूणा व श्री. कुऱ्हाडे सुनिल (प्राचार्य)**
[१] *(सहा.प्राध्यापक) श्रीसमर्थ कॉलेज ऑफ एज्युकेशन, म्हसणे फाटा, ता. पारनेर जि. अहमदनगर (SPPU)*
[२] *(सहा.प्राध्यापक) श्रीसमर्थ कॉलेज ऑफ एज्युकेशन, म्हसणे फाटा, ता. पारनेर जि. अहमदनगर (SPPU)*
[३] *शासकीय उर्दु अध्या. विद्यालय, मुलांचे न्यु मोदीखाना, पुणे —०१*

***Scholarly Research Journal's* is licensed Based on a work at *www.srjis.com***

**प्रास्ताविक :—**

**शिक्षणाबाबत संत रामदांसचे दासबोधात एक वचन आहे.**
**क्रियेवीण शब्दज्ञान । तेचि श्वानाचे वमन ।।**
**भले तेथे अवलोकन । कदापी न करणे ।। १२।१०।३०**

अश्व म्हणजे घाडे, प्रत्येक्ष घोडा पाहणे, त्याचा खरारा करणे, त्याच्यावर मांड ठोकणे, त्याला गाडीला जुपणे हे त्यात कोठेही नाही. शब्द आला की ज्ञान झाले अशी बाळबोध विचारपध्दती त्यात आहे. अदी क्रिकेट सुध्दा पटांगणत खेळायची गोष्ट नव्हे किंवा पाहण्याची सुध्दा गोष्ट नव्हे. तर बोलण्यापुरते किंवा एकमेकांना आकडेवारी सांगण्यापुरते. सारांश मैदानी खेळ म्हणजे फार तर टीव्ही वर पाहण्याचा खेळ एवढेच ।

शिक्षणशास्त्रातले नवे नवे शब्द आणि ते सुध्दा इंग्लिश या एकचा खिडकीतून येणारे. हे शब्द व चित्रे सध्या इंन्टरनेट जमान्यात फार वेगाने आपल्याकडे येते व हवेत विरतात. याचमुळे शिक्षणात अनेक समस्या निर्माण होतात. जगभरात अनेक देश परस्परांमधल्या कलहाने पोखरले आहेत. संपूर्ण मानव जातीच्या समोरची मुख्य समस्या म्हणजे शिक्षणाचा ऱ्हास. यावेळी गरज आहे मानवाच्या अस्तित्वाबरोबर त्याचे कल्याण साधण्याची. यासाठी आवश्यकता आहे शिक्षणाची. जागतिकीकरण, आधुनिकीकरण, याच्या रेटयाने समाज पूर्णपणे ढवळला आहे. मानव स्वत:चे अस्तित्व टिकविण्यासाठी संघर्ष करून दुसऱ्यांना पायदळी तुडवण्यालाच आयुष्य मानू लागला आहे. त्यासाठी गरज आहे शिक्षणाची. समाजातील ही परिस्थिती बदलण्याचे सामर्थ्या केवळ अध्यापकात आहे. नवी पिढी घडवणे, नवे विचार समाजात रूजविणे, विचारांचे कृतीत रूपांतर करणे, कृतीतून वृत्ती घडवणे, वृत्तीतून प्रवृत्ती साकार करणे हा कार्यप्रवाह अध्यपकांच्या जीवनात महत्वाचा असणार आहे. त्याचमुळे भविष्यकालीन शिक्षण शिक्षणाला महत्व आहे.

प्रत्येक देशाचा विकास हा त्या देशतील शिक्षणाच्या गुणवत्तेचा विकास आधारित असतो व शिक्षणाचा दर्जा हा त्या देशातील शिक्षकांवर असतो शिक्षकाची गुणवत्ता ही शिक्षक शिक्षणाच्या गुणवत्तेवर आधारित असते. पर्यायाने शिक्षक शिक्षणाच्या गुणवत्तेसंदर्भात प्रत्येक देशाने गांभीर्याने विचार करून योग्य ती पावले उचलणे गरजेचे आहे आणि जर शिक्षण शिक्षकाचे काही भविष्य नसेलतर निश्चितच देशाच्या विकासाला बाधा येण्याची शक्यता आहे. त्यामुळे शिक्षक शिक्षणाच्या गुणवत्तेचा विचार करणे गरजेचे आहे.

शिक्षक शिक्षणाच्या गुणवत्तेचे निकष व त्याच्या मापनाच्या पध्दती आज निश्चित आहेतच असे नाही. तरीही नॅकने शिक्षक शिक्षणाच्या गुणवत्तेविषयी सात घटकांसदर्भात विचार केलेला आहे. त्यामध्ये अभ्यासक्रम नियोजन व रचना, अभ्यासक्रम संक्रमण व मूल्यमापन, संशोधन विकासकार्य व विस्तारकार्य, भौतिक सुविधा व अध्ययन स्त्रोत संघटन व व्यवस्थापन, विद्यार्थी विकास व चैतन्यदायी अभ्यासक्रम संदर्भात विचार केला तर निश्चितच शिक्षक प्रशिक्षणातून विद्यार्थी पालक व समाज व राष्ट्राच्या गरजांची अपेक्षांची पूर्तता करणारा शिक्षक हा तावून सुलाखून बाहेर पडेल व नवीन ज्ञानधिष्ठित पिढी घडविण्यासाठी सज्ज होईल.

शिक्षक शिक्षणाचा विचार करत असतांना आपल्याला प्रामुख्याने तीन स्तरांचा विचार करावे लागेल.

१. शिक्षक शिक्षकांचे प्रशिक्षण (M.E.d)

२. माध्यमिक व उच्च माध्यमिक स्तरासाठी शिक्षकाचे प्रशिक्षण (B.Ed.)

३. प्राथमिक शिक्षकाचे प्रशिक्षण (D.T.Ed.)

या तीन्ही स्तरांच्या संदर्भात वेगवेगळे शिक्षक शिक्षण कार्यक्रम उद्दीष्टये समस्या आव्हाने व उपाययोजना आहेत. परंतु त्यातील समजनं घटकांचा विचार करून शिक्षक शिक्षणाच्या भविष्यकालीन गुणवत्तेचा विचार करता येईल. भविष्यकालीन शिक्षक शिक्षणाची गुणवत्ता विकसित करण्याचा विचार करतांना शिक्षण शिक्षणाची उद्दिष्टे, शिक्षक शिक्षणातील समस्या, आव्हाने, मर्यादा व शिक्षक शिक्षणात आवश्यक असलेले बदल व सुधारणा यांचाही विचार करावा लागणार आहे.

## शिक्षक शिक्षणाची उद्दीष्टे :—

### अ) अध्ययना संदर्भात उद्दिष्टे :—

१. सामाजिक गरजांसदर्भात ज्ञानात्मक, उपायोजनात्मक व वृत्तीविषयक कौशल्य विकसीत करणे.
२. शिक्षकास निकोप शैक्षणिक तत्वाज्ञानाशी बैठक प्राप्त करून देणे.
३. शिक्षकास कार्यात्मक मानसशास्त्राचे ज्ञान देणे.
४. शिक्षकास गतिमान समाजशास्त्राचे ज्ञान देणे.
५. ज्ञानाच्या क्षेत्रातील नव्या संशोधनाची ओळख करून देणे.
६. आंतरराष्ट्रीय सामजस्यांसाबाबत योग्य दृष्टीकोन विकसित करणे.

### ब) अध्ययना संदर्भात उद्दिष्टे :—

१. अध्यापन विषयाचे विषय ज्ञान व पध्दती दोन्ही दृष्टीकोनातून परिपूर्ण ज्ञान देणे.
२. सर्व साधारण बौध्दीक पातळी लक्षात घेवून ज्ञानाचे संक्रमण निर्माण करण्याची क्षमता निर्माण करणे.
३. शैक्षणिक साहित्याचा वापर करण्याची क्षमता प्राप्त करण्याची क्षमता प्राप्त करून देणे.
४. विद्यार्थ्यांच्या वैयक्तिक गरजा लक्षात घेवून अध्ययन व अध्यापन पध्दतीत योग्य ते बदल करण्याची पात्रता निर्माण करणे.

### क) शिक्षण व्यवसायात अभिवृत्ती संदर्भा उद्दिष्टे :—

१. लोकशाही जीवनाबाबत श्रध्दा निर्माण करून तिचा शालेय विद्यार्थ्यात विकास करण्याच्या दृष्टीने विद्यार्थी शिक्षकाला योग्य त्या वृत्ती निर्माण करणे.
२. शालेय विद्यार्थ्यांचे यशापयशाचे मूल्यमापन करण्याची क्षमता प्राप्त करून देणे.
३. सहशालेय कार्यक्रमाचे नियोजन, पर्यवेक्षक व सहभाग.
४. उदयोगप्रियता, नि:पक्षपाती व मनाचा समतोल या गुणांचे संवर्धन प्रशिक्षण काळात व्हावे.

## शिक्षक शिक्षणात येणाऱ्या समस्या :—

### १. विद्यार्थी संख्या पुरेशी नसणे :—

शिक्षण प्रशिक्षण हे विद्यार्थी केंद्रीत आहे. आज या कोर्सला प्रवेश घेणारा विद्यार्थी व समाज निरूत्साही आहे. अनेक महाविद्यालयातील प्रवेशाच्या अनेक जागा प्रवेशाअभावी रिक्त आहेत. त्यामुळे अनेक समस्या निर्माण होत आहेत.

**२. प्रवेश प्रक्रिया :—**

शिक्षक प्रशिक्षणाची प्रवेश प्रक्रिया ही दिर्घकाळ चालणारी उशीरा सुरू होणारी व गुंतागुंतीची असल्याने अनेक समस्या निर्माण होतात.

**३. कालावधी :—**

पूर्वी एक वर्षाचा असतांना अभ्यासक्रम पूर्ण करण्यास संबंधी अनेक अडचणी येत होत्या परंतु दोन वर्षाच्या अभ्यासक्रम केल्याने विद्यार्थ्यांच्या शिक्षण—प्रशिक्षणातील ओढा कमी झाला आहे.

**४. व्यवस्थापन विषयक समस्या :—**

शिक्षक प्रशिक्षण संस्था चालवित असतांना अनेक प्रकारच्या राजकीय समस्या संभवतात. राज्यपातळीवर दर्जा सुधारण्यासाठी शिक्षण समित्या नियुक्त केल्या जातात. शिक्षण संस्थाना प्रत्यक्ष भेटी देवून भौतिक व मानवी सुविधांची पाहणी केली जाते. परंतु पुढे ठोक उपाययोजना केल्या जात नाही व ठोक निर्णय घेतला जात नाही.

**५. तांत्रिक समस्या :—**

UGC, NCTE स्टेट गव्हर्नमेंन्ट व युनिव्हरसिटी यांच्या नियमांमध्ये एक वाक्यता दिसून येत नाही. UGC, NCTE यांनी प्राध्यपकांच्या अर्हता, पात्रता, अभ्यासक्रम यामध्ये घालून दिलेली मार्गदर्शक तत्वे काही बाबतीत राज्य सरकार व विद्यापीठ पातळीवर स्विकारली जात नाही.

**६. वर्ग वातावरणातील समस्या :—**

प्रशिक्षण देत असतांना प्राध्यापक अपेक्षेप्रमाणे नवनवीन अध्यापन पध्दती, प्रतिमाने व तंत्रज्ञानाचा वापर करीत नाही. त्यामुळे विद्यार्थी विकास व गुणवत्तेच समस्या दिसून येतात. बहुसांस्कृतिक व विविध गरजा असणाऱ्या विद्यार्थ्यांच्या विचार केला नाही. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीन विकासास पोषक असे वातावरण निर्माण केले जात नाही.

**७. प्रशिक्षणाच्या कार्यनिती :—**

शिक्षक प्रशिक्षण महाविद्यालयांमध्ये व्याख्यान, अनुदेशन व परिक्षेच्या दृष्टीकोनातून नोट्स देण्यावर भर दिला जातो. त्यामुळे विद्यार्थ्याला स्वयंअध्ययन व सहकार्य अध्ययपनास वाव मिळत नाही.

**८. अध्यापन सरावा संदर्भात समस्या :—**

केवळ सैदधांतिक भागावर भर दिला जातो व प्रत्यक्ष सराव संदर्भात औपचारिकता असे चित्र पाहायला मिळते.

**९. विद्यार्थी शिक्षकांत आवश्यक क्षमता कौशल्यांचा अभाव :—**

प्रशिक्षण घेवून बाहेर पडणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये शिक्षकी पेशास आवश्यक असणाऱ्या कौशल्याचा अभाव त्यामुळे त्यास व्यावसायिक समायोजनास अडचणी निर्माण होतात.

**१०. शिक्षक प्रशिक्षण संस्थांची वाढती संख्या :—**

आज समाज्यामध्ये आवश्यकते पेक्षा जास्त शिक्षण प्रशिक्षण संस्थांची संख्या वाढलेली दिसून येते. त्यामुळे शिक्षणाचा दर्जा ढासळतो आहे.

**११. विनाअनुदानित महाविद्यालयाची शोकांतिका :—**

वेतनाचा प्रश्न गंभीर आहे. अनेक महिने कर्मचाऱ्यांचे पगार होत नाही.

**१२. नोकरीची टांगती तलवार :—**

प्राध्यापकांना विना अनुदानित महाविद्यालयात कमी पगारात काम करूनही नोकरीची हमी नाही.

## शिक्षक शिक्षणातील आव्हाने :—

आज शाश्वत विकासाचे वारे वाहते आहे. नेटवर्कींग, टीमवर्क, इन्ट्राडिपेडंटची भाषा सातत्याने बोलली जाते. विकसीत देश होणे म्हणजे देशाचे रूप पालटणे. म्हणजेच देशातील शाळा, महाविद्यालयांचे रूप बदलने. संघटन वृत्ती, संघटन चातुर्य, विद्यार्थ्यांमध्ये विकसीत करणे, कारण देशाच्या समस्या सोडविण्याचे व देश विकसीत करण्याचे युवक संघटना हे उत्तर आहे. काम करता करता आणि काम करण्यासाठी अनेकांना सांघिक कार्यात एकजीव करण्याची सवय व कौशल्य विद्यार्थ्यांत आणणे हे खरे आव्हान आहे.

गटातून एक जीवन होण्याची प्रक्रिया, संपर्क, सहवास व सामुहिक जीवन कृतीतून शिक्षण हेही एक मोठे आव्हान शिक्षक—शिक्षणापुढे प्रकर्षाने जाणवत असल्याचे दिसून येते. शिक्षक शिक्षकांना उपक्रमशिलतेकडे वळविणे हे ही आव्हानात्मक काम आहे. निरिक्षण, अनुकरन, प्रयोग, प्रचार आणि प्रसार या पंचसूचीचे उपयोग करणे आहे. विविध संस्थांना भेटी, शाळांना भेटी, सुसंवाद करणे व मैत्री स्थापन करणे आवश्यक आहे. अनुभवी शिक्षकांचे अनुभव, विषय शिक्षक सभा, चाचण्या—परीक्षांचा अभ्यास, विषयवार निकाल चर्चा, अभ्यासक्रम पुस्तकेचा परिचय, हस्त पुस्तीकांची दैनंदिन हाताळणी, प्रश्नपत्रिका, मॉडेल उत्तर सुची, मार्क देण्याच्या पध्दती या सर्वातून अध्यापनाचा दर्जा उंचावतो. हे पटवून देण्याचे आव्हान शिक्षक शिक्षणात आहे. राष्ट्रीय धोरणाचे प्रशिक्षण वर्ग, सेवाअंतर्गत प्रशिक्षण, अन्य प्रशिक्षण वर्ग यातील तज्ञ मार्गदर्शकांचा जास्तीत जास्त उपयोग करून घेणे हे ही आव्हानच आहे. रडक्या, कुरूप, अनुत्तीर्ण विद्यार्थाला समजुन घेणे हे ही शिक्षक शिक्षणातले मोठे आव्हानच मानावे लागेल.

## सूचना व उपाय योजना :—

**अ) प्रवेशा संदर्भातील धोरणात बदल :—**

१. संपूर्ण प्रवेश प्रक्रिया १ जुलै पूर्वी पार पाडून महाविद्यालय सुरू करावे.
२. प्रवेशासाठी निकषाची कडक व प्रामाणिक कार्यवाही करावी.

**ब) अध्यापन शास्त्रातील बदल :—**

ज्ञानाधिष्ठीत समाजाला सामोरे जातांना प्राध्यापकांनी अध्यापणाच्या कार्यनितीमध्ये बदल करणे गरजेचे आहे. त्यामध्ये पुढील अध्यापन कार्यनितीचा वापर करावा.

१. स्वयंशोधन पध्दतीचा अवलंब
२. तंत्रज्ञानाधिष्ठित पध्दतीचा वापर.
३. फ्लिप्ड क्लासरूम.
४. जिवनाभिमुख अध्ययन अनुभव योजना.
५. नैदानिक व उपचारात्मक अध्यापनाचा वापर.
६. जीवन व शिक्षण यांचा संबध जोडणे.
७. अध्यापक नियम पालन.
८. प्रतिमानांचा गरजेनुसार वापर.
९. परावर्तीत/विमर्पी अध्यापनाचा सुयोग्य वापर.
१०. प्रकल्प अथवा कृतीवर आधारीत पध्दतीचा वापर.
११. विद्यार्थी केंद्रित अध्यापन पध्दतीला महत्व.
१२. व्हिडीओ कॉन्फरसिंग.
१३. नियोजनानुसार अध्यापन/योजनाबध्दता.
१४. अध्ययन संक्रमण होईल असे अध्यापन.
१५. जबाबदारीची जाणीव.
१६. व्यक्तिभेदाचा व विभन्नतेनुसार अध्यापन.
१७. सांघिक अध्यापन.
१८. विद्यार्थ्यांचे प्रत्याभरण अत्यावश्यक

**क) वर्गवातावरणातील बदल:—**

१. शिक्षक एक सुलभक
२. लोकशाही वातावरण.
३. बहुसांस्कृतिक विद्यार्थ्यांचा विचार.
४. सहकार्य वृत्ती वाढीस पोषक वातारवण.
५. विद्यार्थ्यांच्या अविष्कार शक्तीला बाब देणारे वातावरण
६. पुरक शैक्षणिक साहित्याचा वापर.
७. वर्गरचना विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्वाचा विकास करणारी.
८. सर्वसमावेशक दृष्टीकोन.
९. विभिन्न/विशेष गरजा असणाऱ्या विद्यार्थ्यांकडे पुरेसे लक्ष.
१०. तंत्रज्ञानाधिष्ठित वर्गरचना

**ड) अध्ययनकर्त्या संदर्भातील बदल:—**

आजचा विदयार्थी ज्ञानरचनावादी म्हणजेच स्वयम ज्ञान प्राप्त करण्यास प्राध्यान्य देणारा आहे. त्या अनुशंगाने शिक्षण प्रशिक्षणात सुधारणा करणे आवश्यक आहे.

१. विदयार्थ्यांच्या अविष्कार शक्तीला चालना देणे.

२. स्वयंम अध्ययनास प्रेरक उपक्रमाचे नियोजन करणे.
३. प्रशिक्षणातून विदयार्थ्यांचा आत्मविश्वास वाढीस लावणे.
४. नेतृत्व गुण विकसित करणे.
५. दैनंदित जीवन जगण्यात आवश्यक ज्ञान कौशल्याचे शिक्षण देणे.
६. आरोग्य व योगाच्या प्रात्यक्षिकावर भर देणे.
७. शेती विषयक आवश्यक ज्ञान व कौशल्या प्रशिक्षणाची सोय करणे.
८. लघु उदयोगाविषयक ज्ञान देणारा अभ्यासक्रमाचा अंतरभाव करावा.
९. स्वय संरक्षणाचे शिक्षण देणे.
१०. धार्मिक सांस्कृतिक नैतिक मुल्यांची जोपासना करणारे शिक्षण देणे.

**समारोपः—**

भविष्यात शिक्षक शिक्षणाची गुणवत्ता विकसित करण्यासाठी वरील उपयोजनांचा व मार्गदर्शक सुचनांचा जर गांभीर्याने अवलंब केला तर शिक्षक शिक्षणाचे भवितव्य नक्कीच उज्ज्वल असेल ज्यातून शिक्षक शिक्षणाचा परिणामतः शिक्षकांचा आणि पर्यायाने राष्ट्राचा विकास साध्य करता येईल.